श्रीमती दर्शनी धवड :– मा. महापौरजी पाईट ऑफ इंन्फॅारमेंशन, मा. सदस्य जगदीश भैय्या यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो अगदी बरोबर आहे. आमच्या प्रभागा मध्ये गार्डन नीमपार्क आहे तेथे ग्रीन जिम इन्स्टॉल केले गेलेले आहे कुणाच्या फंडातुन करण्यात आले आमदार साहेबांच्या किंवा कुठून करण्यात आले आहे मला त्याची माहिती नाही. जे काही इन्स्ट्रयुमेंट इन्स्टॉल केले गेले आहे त्याचे स्वागत आहे. ग्रीन पार्क हा जो पार्क आहे त्यामध्ये सामाजिक कार्यक्रम होत असतात. आता अशी परिस्थिती झालेली आहे तिथल्या 40 माणसांनी कंम्पलेट केलेली आहे. त्यामध्ये मी माहिती घेण्याचा प्रयत्न केला, झोन मध्ये त्या बद्दल माहिती नाही. गार्डन विभागालाही माहिती नाही. त्या दिवशी सकाळी मेंडूलकर साहेबांना फोन करुन विचारले तर ते म्हणतात की मला महापौरांसह 10 वाजता व्हीजीट करायला जायचे आहे तर मी काही येवू शकत नाही. हे नागपूर महानगरपालिकेचे गार्डन आहे हया बद्दल गार्डन विभागाला कुठलीही माहिती नाही. ते म्हणतात त्यांना काही माहिती नाही त्यांनंतर लोकांची कम्पलेट आली. काही नगरसेवकांनीही सहया करुन त्यांना कम्पलेट दिली, जे इन्स्टॉल केले आहे ते प्रापर जागी इन्स्टॉल झाले पाहिजे. तेथील लोकांना वॉकीग ट्रॅक भेटले पाहिजे आणि इतके वर्षापासून येथे होत असलेले कार्यक्रम आहे ते ही झाले पाहिजे. तेथे आणखी कितीतरी काम केले आहे त्याला जवाबदार कोण आहे.

महापौर :– प्रशासन उत्तर देत आहे.

सहा. आयुक्त (श्री मोरोणे) :–मा. सदन मा. महापौरजी नीमपार्क येथे काही काम सुरु असल्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री जगदीश ग्वालबंशी यांनी मला भ्रमनध्वनीवर काही दिवसापुर्वी सांगीतले होते आणि त्यांनतर चौकशी केली असता कळले की राज्य शासनाच्या स्पोर्टस विभागातर्फे सन्माननीय आमदार श्री. सुधाकररावजी देशमुख यांच्या फंडातून इथे ग्रीन जिमचे काम सुरु आहे. ग्रीन जिमचे जे काम आहे ते आपल्या गार्डन विभागामार्फत होत असल्यामुळे मी ताबडतोब गार्डन विभागाशी संपर्क साधला.

श्रीमती दर्शनी धवड :– गार्डन विभागातर्फे ते होत नाही आहे.

श्री. जगदीश ग्वालबंशी :– मा. महापौरजी, गार्डन विभाग की ओरसे हो रहा हो की नागपुर सुधार प्रन्यास की ओरसे अपनी प्रापर्टी की देखभाल करना ये किसकी जिम्मेदारी है ये मेरे प्रभाग का विषय नही पूरे नागपूर शहर का विषय है । अपने प्रापर्टी की देखभाल करना कोणसे तरीकेसे वहॉपर डेव्हलपमेंट करना ये किसकी जिम्मेदारी है । यह जो काम किया गया इसमें नागपूर महानगरपालिका को विश्वास में नही लिया गया ये क्या कहते है के ये जिम्मेदारी आपकी है ये जिम्मेदारी के आधारपर जबकी वहॅा गणपती उत्सव होता है । कोई भी कार्यक्रम का पैसा कापोरेशन लेता है, कार्पोरेशन की आय बढती है । तो उस प्रापर्टी की देखरेख करने की जिम्मेदारी किसकी है । ग्रीनजीम चाहे एन.आय.टी. का हो या आमदार हो ये आपकी जिम्मेदारी है ,ये सारी बात होने के बाद में आपने अपनी जिम्मेदारी क्यों नही

निभायी.।

श्री संदीप जोशी :— सन्माननीय महापौरजी, हा जो विषय जगदीशजी ग्वालबंशी यांनी हया ठिकाणी उपस्थित केलेला आहे असे विषय अनेक प्रभागामध्ये अनेक वेळा होत असतात. नागपूर महानगरपालिकेच्या जागेवरती क्रिडा अधिकारी असेल, नागपूर सुधार प्रन्यास असेल आणि कोणती संस्था असेल इथे काही ना काही लागत असते, काम होत असते, आणि जिथे वाटले तिथे ते लावून देत असतात. हया निमपार्क मध्ये मोठे मोठे प्रकारचे कार्यक्रम होत असतात आणि हे होत असतांना हया ठिकाणी जे ग्रिन जिम लावले होते ते ग्रीन जिम बरोबर त्या कार्यक्रमाच्या मध्ये ग्राउंडच्या मधोमध लावलेले आहे. आता हे का लावलं मला काही समजलं नाही. सहा. आयुक्त यांनी त्यांना माहिती मिळाल्यावरती ज्या प्रमाणे दखल घ्यावयाला पाहिजे होती त्या प्रमाणे दखल घेतली नाही. जागा आपली असतांना महानगरपालिकेच्या जागेवर कूठे काय लावावयाचे ही जबाबदारी संपूर्णतः आपली आहे. त्यामुळे आपण प्रशासनाला निर्देश द्यावे की सात दिवसाच्या आत हे ग्रीन जीम त्या ठिकाणावरुन हटवून सन्मानीय नगरसेवक ज्या ठिकाणी सांगतात त्या ठिकाणी लावण्यात यावी आणि त्याच प्रमाणे नागपूर शहराच्या कुठल्याही अश्या जागा असतील त्या ठिकाणी महानगरपालिकेच्या जागेवरती इतर संस्था हया प्रकारची ॲक्टीवीटी करीत असते तर सहा. आयुक्तांची ही जबाबदारी आहे त्या पध्दतीने त्यांनी आपल्या जागेवरती महानगरपालिकेची एन.ओ.सी. असल्याशिवाय कुठलीही ॲक्टीव्हीटी होवू देवू नये असे निर्देश आपण प्रशासनाला द्यावे

महापौर :— मा.सत्तापक्ष नेते श्री.संदीपजी जोशी यांच्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.

**<u>प्रश्न क. 56</u>**:— मनपातील सुरक्षा रक्षक कंत्राटा संदर्भात प्रश्न

श्री. ऋषिकेश उर्फ बंटी शेळके:— मा.महापौरजी, हा प्रश्न जो आहे याच्या अनुषंगाने जेष्ठ नगरसेवक श्री.प्रफुल्ल गुडधे यांनी या अगोदर पत्र दिलेले आहे आणि पाठपुरावा सुध्दा केला आहे. त्यानंतरही आतापर्यंत त्या प्रश्नाचे निराकरण झाले नाही त्या अनुषंगाने पुन्हा एकदा सभागृहामध्ये सुरक्षा रक्षकाच्या माध्यमातून आपली महानगरपालिका टक्केवारी घेवून राहिली. कारण की अपर आयुक्त यांना 2016 ला पत्र दिले होते, आयुक्तांना सुध्दा पत्र दिले होते किंबहुना आपण महाराष्ट्र सुरक्षा गार्ड बोर्डचे रक्षक लावले पाहिजे. जवळ जवळ वर्षाकाठी 70 लक्ष रूपयाची आपल्या महानगरपालिकेची बचत होवू शकते. आपण सुरक्षा गार्ड बोर्डला डावलून 8 खाजगी एजन्सीला कां बरे कंत्राट देत आहे हा सर्वप्रथम माझा प्रश्न आहे. जे सुरक्षा रक्षक लावले आहे त्या सुरक्षा रक्षकाची तपासणी करीत नाही. त्यांची परीक्षा होत नाही. जर महाराष्ट्र सुरक्षा बोर्डाचे रक्षक लावले तर त्यांची प्रापर तपासणी होते. परीक्षा होते. त्यामुळे कुठे काही झाले जर झाले तर कोणतीही महानगरपालिकेची जबाबदारी राहणार नाही, संपुर्ण जबाबदारी ही त्या सुरक्षा मंडळाची राहणार आहे. हा सभागृहाच्या माध्यमातून आरोप आहे, कुठेनाकुठे आपली टक्केवारी आपल्या प्रशासनाची टक्केवारी या माध्यमातून आहे. यात कुठे ना कुठे पैश्याची देवाणघेवाण होवून राहिली. प्रश्नाचे उत्तर प्रशासन देणारच आहे. मा.सदस्य गुडधे यांनी पत्र दिले, पाठपुरावा केला. 40 सुरक्षा रक्षकांनी व्यक्तिगत सांगितले, त्यांनी पत्र दिले, आयुक्तांना पुरावे दिले आणि सांगितले की आमचे एटीएम कार्ड जप्त केले. आमचा पगारच आम्हांला देत नाही. डिजीटल इंडिया पेटीएमच्या माध्यमातून सर्व व्यवहार करण्यात

यावे, कॅशने व्यवहार करू नका असे नेते मंडळी सांगत असतांना त्याच्या नंतरही अर्धपगार देत आहे आणि तेही कॅशमध्ये देण्यात येत आहे. यावर निर्णय कधी होणार आहे, हे केव्हा करणार आहे. सायबर टेककडून टॅक्सच्या माध्यमातून जनतेच्या पैशाची लूट करून राहिले. आपल्याला निधी कमी पडत आहे  तर 70 लक्ष रूपये जर एक वर्षात वाचवू शकतो तर कां बरे वाचवू शकत नाही. अपर आयुक्तांचे 2016 चे पत्र आहे. 19.04.2017 ला प्रस्ताव क्र. 18 या सभागृहात आला होता. स्थायी समितीच्या माध्यमातून तो आपण धुडकावला, कां बरे धुडकावला.

महापौरः— प्रशासनाने उत्तर दयावे.

सहा.आयुक्त(श्री.धामेचा):—मा.महापौरजी, सन्माननीय सदन, मा.सदस्यांनी विचारले होते. की नागपूर महानगरपालिकेत किती एकुण सुरक्षा एजन्सी आहेत तर सध्या 8 सुरक्षा एजन्सी आहेत.

श्री. ऋषिकेश उर्फ बंटी शेळकेः— मा.महापौरजी, याच्या अगोदर या प्रश्नाचा पाठपुरावा झाला आहे. 40 सुरक्षा रक्षकांच्या तक्रारी झाल्या आहेत.  काय ते नेमके सांगा. फालतुची घुमवाघुमवी करू नका.

सहा.आयुक्त(श्री.धामेचा):—मा.महापौरजी, एप्रिल महिन्यात स्थायी समितीपुढे प्रस्ताव पाठविला होता. सर्वप्रथम पार्श्वभुमी सांगू इच्छितो,....

श्री. ऋषिकेश उर्फ बंटी शेळकेः— मा.महापौरजी, पार्श्वभुमी सांगू नका. 19.04.2017 चा प्रस्ताव क्र. 18 स्थायी समितीने धुडकावून लावला त्यानंतर सांगा.

सहा.आयुक्त(श्री.धामेचा):—मा.महापौरजी,पार्श्वभुमी सांगितली तर दुसरा टेंडर 2014 चा होता त्याचा खुलासा होईल.

श्री. प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, प्रस्ताव सभागृहाला पाठविला होता रेट कम्पॅरेटीव्ह मध्ये पाठविला होता. रेट कम्पॅरेटीव्ह सुरक्षा रक्षक मंडळाच्या माध्यमातून किती खर्च होणार आहे आणि खाजगी एजन्सी मार्फत किती खर्च होणार आहे याची तफावत दिली आहे. ती तफावत सभागृहाला सांगण्यात यावी.

सहा.आयुक्त(श्री.धामेचा):—मा.महापौरजी, आपण स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविला होता तेव्हा अस्तित्वात जो दर होते त्याची कंम्पॅरीझजन करून सुरक्षा रक्षक मंडळामार्फत 55 लक्ष रूपयाची बचत होईल असा प्रस्ताव पाठविला होता. त्यानंतर स्थायी समितीने निर्देश दिले की प्रायव्हेट एजन्सी आपल्याशी करारनामा करतात. एखादया वेळी नागपूर महानगरपालिकेच्या प्रापर्टीची चोरी झाली, काही नुकसान झाले तर त्याची भरपाई कोण करेल याबद्दल शहानिशा करा. आपण शहानिशा केली तेव्हा सुरक्षा रक्षक मंडळांनी सांगितले की करारनामा करू शकत नाही. म्हणून आपण तसा स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविला. नंतर स्थायी समितीने निर्देश दिले की टेंडर मागवून खाजगी एजन्सी करारनामा करतात महानगरपालिकेच्या मालमत्तेचे नुकसान झाले तर भरपाई करता येवू शकते. आपण टेंडर इनवाईट केले. टेंडरचे रेट कमी आले आहेत त्यात आपली 18 लक्ष रूपयाची बचत होणार आहे.

श्री. प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, टेंडर ओपन झाले आहे काय?

सहा.आयुक्त(श्री.धामेचा):—मा.महापौरजी, ओपन झाले आहे.

श्री. प्रफुल गुडधे :—जुन्या टेंडरमध्ये सुरक्षा रक्षक मंडळाचे रेट जास्त होते काय? जे कम्पॅरेटीव्ह पाठविले होते त्यात सुरक्षा रक्षक मंडळाचे कमी होते आणि खाजगी एजन्सीचे रेट

जास्त होते. निर्णय घेत असतांना सुरक्षा रक्षक बोर्डाच्या माध्यमातून ही सेवा घेतली पाहिजे अशा प्रकारचा निर्णय या सभागृहाने घेतला होता. सभागृहाच्या भावना लक्षात घेवून तत्कालीन आयुक्तांनी स्थायी समितीपुढे प्रस्ताव पाठविला होता. स्थायी समितीने जी सबब दिली, जे कारण दिले होते ते असे होते सुरक्षा रक्षक बोर्ड महानगरपालिकेशी करारनामा कोणत्याही पध्दतीने करीत नाही म्हणून सुरक्षा रक्षक बोर्डामार्फत ही सेवा घेवू नका अशा पध्दतीचा ठराव झाला होता. सुरक्षा रक्षक गार्ड च्या माध्यमातून 54 लक्ष रू. वाचवून राहिले ते न वाचविता पुन्हा रिटेंडर करून राहिले आणि रिटेंडर मध्ये आता म्हणत आहेत की त्याचे दर सुरक्षा रक्षक बोर्डापेक्षा कमी आले आहेत.

सहा.आयुक्त(श्री.धामेचा):– मा.महापौरजी, आपण टेंडरच केले आहेत.

श्री. प्रफुल गुडधे :– जे दर आहेत ते आपण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मिनिमम वेजेसप्रमाणे काढले होते काय? जे दर कम्पॅरेटीव्ह केले होते त्यात मोठी चुक झाली होती. ती चुक अशी झाली होती की सुरक्षा रक्षक बोर्डाला सर्विस टॅक्स जो 15 टक्के लागत नाही कम्पॅरेटीव्ह करतांना तो ॲड करून पाठविला होते. पाठविले होते काय?याचे उत्तर द्यावे.

सहा.आयुक्त(श्री.धामेचा):– मा.महापौरजी, कम्पॅरेटीव्ह दोन्ही रेट पाठविले होते.

श्री. प्रफुल गुडधे :–हा विषय स्थगित ठेवावा याची मी फाईल आणली नाही. मुळ प्रश्न हा बंटी शेळके यांचा होता. चुकीने माझी फाईल राहून गेली. यात दर कम्पॅरेटीव्ह करतांना प्रशासनाने स्थायी समितीची दिशाभूल केली गेली आहे ती मी आता निर्देशात आणून देवू शकत नाही. ती फाईल माझ्याकडे आता नाही.

श्री.प्रविण दटके:–मा.महापौरजी, दोन मुद्दयावर प्रफुल्लजीने म्हटले. कम्पॅरेटीव्हमध्ये चुक झाली असेल तर दाखवू शकतात परंतु सुरक्षा गार्ड बोर्ड एग्रीमेंट करायला तयार नाही. अजनी चौकात राजीव गांधी यांचा ज्या ठिकाणी पुतळा आहे. त्या ठिकाणी लाईट आणि काही साहित्य चोरी गेले आपण सुरक्षा रक्षक एजन्सीकडून वसुल केलेले आहे. सुरक्षा रक्षक बोर्ड जर एग्रीमेंट करण्यात तयार असेल तर त्यांच्यासोबतच गेले पाहिजे. परंतु जर एग्रीमेंट करण्यास तयार नसेल तर स्थायी समितीने वेगळा मार्ग निवडला आहे त्याच्यासोबत राहिले पाहिजे.

श्री. प्रफुल गुडधे :–मा.महापौरजी, सुरक्षा गार्ड बोर्ड हे काही तुमच्या आमच्या मालकीचे नाही. सुरक्षा गार्ड बोर्ड हे राज्य शासनाचे आहे. राज्य शासनाने गठीत केलेले ते गार्ड बोर्ड आहे. आपल्या शासनाच्या गार्ड बोर्डवर आपला विश्वास नाही असा त्याचा अर्थ होतो.

श्री.प्रविण दटके:–पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, कोणावर विश्वास असावा, नसावा असा विषय नाही. गार्ड बोर्डने एग्रीमेंट करून दयावा महानगरपालिकेला एवढा साधा मुद्दा आहे. विषयाला सुरूवात कशी झाली. टक्केवारी, मग अमक होत तमक होत म्हणून स्थायी समितीने ठराव वापस पाठविला म्हणून मी बोललो.

श्री. प्रफुल गुडधे :–मा.महापौरजी, माझा तो विषय आहे, महानगरपालिकेची आर्थिक बचत व्हावी एवढा माझा विषय आहे. माझा संबंध कोणत्याही एजन्सीशी नाही. सुरक्षा रक्षकांचे आर्थिक शोषण होत आहे ही वास्तविकता आहे. महानगरपालिका 22 ते 24 हजार रू एका सुरक्षा रक्षकावर खर्च करीत आहे परंतु प्रत्यक्षात सुरक्षा रक्षकांना फक्त 5–6 हजार रूपये मिळत आहे ही वास्तविकता आहे. हे सर्व सभागृहाला मान्य आहे. यावर तोडगा कसा काढावयाचा तर हे टक्केवारीचे आरोप होवून राहिले महापौरजी, ती मॅन्डेटरी डयुटी ठेवत नाही म्हणून आरोप होत आहे. त्यामध्ये काही चुक आहे असेही मी मानत नाही. आपण हे ठेवलेच

नाही म्हणून टक्केवारीचे आरोप होणार नाही. आपण सुरक्षा रक्षक गार्ड बोर्डची सेवा घेतली तर आपली महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल आणि त्या कर्मचा–यांचे आर्थिक शोषण होणार नाही. त्यात ट्रान्सपरंसी राहील. स्थानिक स्वराज्य संस्थांनी राज्य सरकारच्या सुरक्षा गार्ड बोर्डाच्या माध्यमातून सेवा न घेता त्यांच्यावर अविश्वास दर्शविणे योग्य होणार नाही. मी स्थायी समितीच्या निर्णयाच्या विरोधात राज्य शासनाकडे गेलो आहे तो विषय राज्य सरकारकडे प्रलंबित आहे. मी आता राज्य सरकारला विनंती केली आहे की स्थायी समितीचा तो ठराव आहे तो रद्दबादल करावा त्या अगोदर बंडू शेळके यांनी सभागृहात विषय आणला तो सभागृहाने रद्द केला तर शासनापर्यंत जाण्याची आवश्यकता भासणार नाही. माझी या सभागृहाच्या माध्यमातून विनंती आहे की जी महानगरपालिकेत मोठया प्रमाणात अनियमितता होत आहे. आर्थिक शोषण होत आहे. महानगरपालिकेचा मोठया प्रमाणात त्यात खर्च होत आहे. स्थायी समितीचा जो ठराव आहे त्यावेळेचा सुरक्षा गार्ड बोर्ड माध्यमातून सेवा न घेण्याचा, जे कारण त्यांनी दिले आहे की एग्रीमेंट केले पाहिजे. एग्रीमेंटची काही आवश्यकता नाही. या ठिकाणी राज्य सरकारचे प्रतिनिधी म्हणून आयुक्त येतात, आयुक्त काय एग्रीमेंट करून येतात काय? मा.महापौरजी ते विश्वासाने येतात ते शासनाचे प्रतिनिधी आहेत. जे कर्तव्य त्यांना पार पाडावयाचे असतात ते कायदेशिररित्या पार पाडावे लागते. चोरी झाली असेल त्याची भरपाई सुरक्षा रक्षक एजन्सीकडून कायद्याने करण्याची तरतूद आहे. म्हणून एग्रीमेंट केलाच पाहिजे असे नाही. शासनाचे प्रतिनिधी या महानगरपालिकेत येतात ते काय एग्रीमेंट करून येत नाही. म्हणून हा स्थायी समितीचा ठराव रद्द करून सुरक्षा गार्ड बोर्ड यांच्या माध्यमातून सेवा घ्यावी अशी माझी विनंती आहे. सभागृहामध्ये तो विषय मान्य केल्यास ती शासनाकडे अपील राहील तर अपील करण्याची आवश्यकता भासणार नाही.

श्री.संदीप जोशीः–मा.महापौरजी, कंत्राटदारामार्फत सुरक्षा रक्षकांचे जे काही शोषण होत आहे हा विषय मा. प्रफुल्ल गुडधे यांनी ठेवला. या विषयामध्ये कंत्राटदारामार्फत हे शोषण करण्यात येवू नये याबाबत कोणचेही दुमत असण्याचे कारण नाही. महानगरपालिका पैसा देत असेल आणि कंत्राटदार त्यातून कर्मचा–यांचे मिनिमम वेजेस देत नसेल तर ते अत्यंत अयोग्य आहे. हे होत असतांना राज्य सरकारच्या गार्ड बोर्डच्या माध्यमातून ही सेवा घेतलीच पाहिजे. करारनामा केलाच पाहिजे. करारनामा न करण्याचा आग्रह धरून कर्मचा–यांना ठेवणे ही भुमिका घेणे सुध्दा चुकीचे आहे. महानगरपालिकेची संपत्ती आहे आणि जे सुरक्षा रक्षक त्या ठिकाणी लावले गेले आणि ते असतांना जर चोरी झाली आणि चोरी जात असतांना एकीकडे सुरक्षा रक्षक कंत्राटदारा कडून त्याची रक्कम मी माहिती घेतली अजनी चौकात झालेल्या चोरीच्या संदर्भात, त्या ठिकाणी जे लाईट चोरीला गेले त्याचे साडे तीन लाख रूपये आपण त्या कंत्राटदाराला पकडून घेतले आहे. महानगरपालिकेच्या संपत्तीची जर चोरी झाली तर ती चोरी आपल्याला त्या कंत्राटदाराकडून घेता तरी येईल. हे गार्ड बोर्ड ज्या पध्दतीने करारनामा करण्यास तयार नाही. आपण करारनामा करा म्हटले तर ते करारनामा करण्यास तयार नसतांना महानगरपालिकेचा फायदा होईल. असे दोन्ही विषय महानगरपालिकेच्या संपत्ती जर चोरी गेली तर त्याचा पैसा वसुल करता आला पाहिजे. दुसरे सुरक्षा रक्षक बोर्डच्या रेटच्या संदर्भात मा.प्रफुल्ल गुडधे यांनी म्हटल्याप्रमाणे त्याच्या पेक्षा जर जास्त असेल तर ते केले पाहिजे हेही बरोबर नाही. याची संपुर्ण साधकबाधक विचारविनिमय करून लिगल ओपिनियम माझ्या माहितीप्रमाणे बोलाविले आहे ते पाझीटीव्ह आहे. लिगल ओपिनियम सभागृहासमोर

ठेवण्यात यावे.

श्री. प्रफुल गुडधे :—मा.महापौरजी, लिगल ओपिनियमची काही आवश्यकता नाही. सुरक्षा गार्ड बोर्डाकडून सेवा घेतलीच पाहिजे हे बंधनकारक नाही परंतु महानगरपालिकेची बचत जर होत असेल तर निश्चितपणे तर सुरक्षा गार्ड बोर्डाकडून सेवा घेतली पाहिजे या मताचा मी आहे.

श्री.संदीप जोशीः—मा.महापौरजी, आताच सांगितले जे टेंडर ओपन झालेले आहे त्यात 18 लक्ष रूपये सुरक्षा बोर्डापेक्षा कमी आलेली अमाऊंट आहे. आपल्या महानगरपालिकेची जी काही संपत्ती जर चोरीला गेली तर संपुर्ण रक्कमेची भरपाई कंत्राटदार देण्यास तयार आहे. या दोन्ही गोष्टी होत असल्यास नियमाप्रमाणे पुढे जावे असे मला वाटते.

श्री. प्रफुल गुडधे :—मा.महापौरजी, महानगरपालिकेची बचत होणार आहे मा.सत्तापक्ष नेते यांनी सांगितले ठीक आहे. परंतु त्या सुरक्षा रक्षकांना किमान वेतन मिळावे याची खबरदारी घेतांना महानगरपालिकेकडे ती यंत्रणा आहे काय? ती कशी निर्माण करणार आहे. मी कोणत्याही एजन्सीच्या विरोधात नाही.

श्री.बाल्या बोरकरः—पाईंट ऑफ इन्फोंमेशन, गुडधे साहेबांनी सांगितले की त्या सुरक्षा रक्षकांचा त्याचा अमाऊंट त्यांचा पगार त्यांना बरोबर मिळायला पाहिजे. मी आपले आयुक्त साहेब सिद्दीकी साहेबांना सांगू इच्छितो. सिद्दीकी साहब, आप दो सेक्युरिटी गार्ड को कोई भी गार्डन मे मिलना और पुछना की आप सुबह से हो की शाम से हो तो वह बोलेगा मी सुबह से रात तक डयुटी पर हूॅ, मै दो डयुटी कर रहा हूॅ । क्योंकि मेरा पगार है 7 हजार रू. और मुझे मिलते है 5 हजार रू तो मेरा पगार निकलता है 10 हजार रू. दो शिफ्ट का । मुझे इस एजन्सी के बारे मे कहना है की जो एजन्सी के माध्यम से जो पेमेंट करते हो वो चेक से पेमेंट करो । एजन्सी को कहो की एजन्सी मे जो कर्मचारी काम कर रहे है उनका पेमेंट चेक से करो

श्री.कमलेश चौधरीः— मा. महापौरजी, दोन्ही टेंडर काढले आहे त्यातमध्ये आपण बहुउद्देशीय सुरक्षा रक्षक घेतले आहे काय? बहुउद्देशीय सुरक्षा रक्षक त्यात संम्मेलीत केले आहे काय? त्याची माहिती मला पाहिजे आहे.

महापौरः— प्रश्नावर चर्चा झाली. मा.सदस्यांनी ज्या काही सुचना केल्या त्या सुचनेनुसार प्रशासनाने योग्य कार्यवाही करावी. विषयपत्रिकेला सुरूवात करण्यात येत आहे.

श्री.दयाशंकर तिवारीः—मा.महापौरजी, विषयपत्रिका शुरू करके के पहले मैने एक स्थगण प्रस्ताव की सुचना प्रेषित की है । कृपया उसपे तुरंत वाचन करे और अपना निर्णय दे ।

निगम सचिवः— मा.महापौरजी, मा.सदस्य श्री.दयाशंकरजी तिवारी यांनी महानगरपालिका कामकाम नियमावलीतील 2016 अन्वये कलम 1(ट) अन्वये स्थगण प्रस्तावाची नोटीस दिली आहे. मी त्याचे वाचन करतो.

स्थगण प्रस्ताव

नागपूर शहर परिसरात नवीन कर आकारणीची प्रकिया सुरू आहे या प्रतिकियाबाबत नागरिकांमध्ये आक्षेप दिसत आहे त्या आक्षेप आक्रोच, प्रदर्शन सामान्य नगरसेवकांवर होत आहे. या सर्व प्रतिकियांच्या विषयावर चर्चा करून प्रतिकिया चुक असेल व त्याला सुधारणा घडवून आणण्यासाठी स्थगण प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

हस्ता/—प्रस्तावक श्री.दयाशंकरजी तिवारी
हस्ता/— अनुमोदक श्री. सुनिलजी अग्रवाल.

दुसरे स्थगण प्रस्ताव प्राप्त झालेले आहे आणि हे स्थगण प्रस्ताव मा. प्रफुल्लजी गुडधे यांनी सादर केलेले आहे. त्याचे मी वाचन करीत आहे.

स्थगण प्रस्ताव

नागपूर शहरातील मालमत्ता धारकांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कराधार नियम क्र. 15 (2) नुसार नोटीस न पाठविता हे नियमबाहय मागणीपत्र पाठविल्या जात आहे त्यावेळी मालमत्ताधारक कराधान नियम कलम 16 अन्वये मुल्यनिर्धारणा विरूध्द तक्रार करण्याच्या अधिकारापासून वंचित राहतात. नागरिकांच्या कायदेशिर हक्काचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे. तसेच मुल्यनिर्धारणाच्या पध्दतीस अनेक कायदेशिर त्रुटया असल्याने त्या अनुषंगाने चर्चा करणे व कर आकारणीत प्रक्रियेत सुधारणा करणे व त्या बाबीवर चर्चा करण्यासाठी स्थगण प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

हस्ता/—प्रस्तावक श्री.प्रफुल्लजी गुडधे
हस्ता/—अनुमोदक सौ. प्रणिता शहाणे

श्री. तानाजी वनवेः—मा. महापौरजी, या स्थगण प्रस्तावावर हा नागपूर शहराच्या नागरिकांवर जो जास्तीचा टॅक्सचा बोजा लावण्यात आलेला आहे. त्याच्यामध्ये नियमाचे पालन करण्यात आलेले नाही. कोणतेही नोटीस, सुचना देण्यात आली नाही,कोणत्याही नियमाचा आधार घेतलेला नाही आणि डायरेक्ट लोकांना डिमांड दिलेल्या आहेत.

श्री. दयाशंकर तिवारीः— मा.महापौरजी, विषय गंभीर है। और गंभीर विषय पर निर्णय लेने के लिए सभागृह मे गंभीर चर्चा की नितांत आवश्यकता है । चर्चा की गंभीरता को गंभीरता से सुनने के लिए आयुक्त भी आवश्यकता है । जिनके नेतृत्व मे शहर का कार्य किया जाता है । आज की सभा मे आयुक्त नही है, अगली सभा केवल व केवल इस विषय को लेके ली जाये । उसमे इसपर सखोल चर्चा हो, संपुर्ण शहर इस विषय को लेकर आक्रमक है, आप इस पर इसप्रकार का निर्देश दे ।

श्री.प्रफुल गुडधेः—मा.महापौरजी, जेष्ठ मा.सदस्य श्री.दयाशंकर तिवारी यांनी सांगितले गंभीर विषयावर गंभीर चर्चा झाली पाहिजे आणि ऐकणारे ही गंभीर असले पाहिजे. परंतु कायद्याचे सरसकट उल्लंघन होत असेल तर ते ताबडतोब थांबविले पाहिजे. आपण या संदर्भात सविस्तर चर्चा घेवून आयुक्त नसल्यामुळे प्रशासकीय कार्यवाही करतांना अडचण होवू शकते. नोटीस न देता डिमांड पाठविण्यात आलेल्या आहेत. त्या तात्काळ रद्द करण्याचे निर्देश दयावे. या संदर्भात चर्चा लवकरात लवकर सभा घेवून करावी. बेकायदेशिर ज्या डिमांड पाठविल्या आहेत त्या रद्द करण्याचे निर्देश दयावे. कायदयाचा अवलंब न करता अशा पध्दतीने नोटीसेस पाठविल्या असेल ते नागरिकांवर अन्याय कारक आहेत. या संदर्भात सविस्तर चर्चा आपण म्हणाल त्या दिवशी आपण सभागृह घेवून त्या सभागृहात करू परंतु त्या आधी या डिमांड रद्द करण्याचे निर्देश दयावे.

(बेल)

महापौरः—जेष्ठ सदस्य श्री.दयाशंकरजी तिवारी आणि जेष्ठ सदस्य श्री.प्रफुलजी गुडधे यांनी कर आकारणी प्रक्रियेवर चर्चा करण्याकरिता स्थगण प्रस्ताव दिलेला आहे. शहरातील मालमत्तेच्या डिमांड सत्तापक्ष आणि विरोधीपक्ष या दोघांनाही चर्चा करावयाची आहे. प्रशासनाचे

प्रमुख मा.आयुक्त श्री.अश्विन मुदगल हे रजेवर आहेत ते या चर्चेला उपस्थित असणे अत्यावश्यक आहेत त्यामुळे या विषयावर चर्चा करण्याकरिता केवळ याच विषयावर विशेष सभागृह बोलविण्यात येईल करिता प्रशासनाने संपुर्ण तयारी करावी. तोपर्यंत नियमाचे काटेकोरपणे पालन करावे.

<u>**ठराव क्रमांक 155ः—**</u> अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागातील अधिकारी / कर्मचारी वर्गाचे शासनमान्य सेवा प्रवेश नियमांत काही पदांमध्ये असलेल्या त्रृटयांना सुधारित करण्यास शासनाची मान्यता घेण्याबाबत.

शासन निर्णय क्र. नामपा 2015 / 1652 / प्र.क्र. 166 / नवि–'26 दि. 12 मे, 2017 प्रमाणे अधिकारी / कर्मचारी वर्गाचे सेवाप्रवेश नियम शासन नियम शासनमान्य झाले आहे. ज्यामध्ये काही पदांतील तांत्रिक शैक्षणिक पात्रतेमध्ये आंशिक त्रृटया असल्याने कर्मचाऱ्याला पदोन्नती देतेवेळेस प्रशासनाला तांत्रिक अडचण निर्माण होत आहे.

या अनुषंगाने अग्निशमन विशेष समितीच्या दि. 16.06.2017 रोजीच्या बैठकीत या विषयाला विषय पत्रिकेत ठेवण्यात आले होते..यावर खालील विसंगती बाबत विस्तृत चर्चा करण्यात आली.

1. प्रमुख अग्निशामक विमोचक

सेवाप्रवेश नियमानुसार या पदामध्ये पदोन्नती : अग्निशामक विमोचक या पदावर नियमित 3 वर्ष सेवा पुर्ण करित असलेल्या व वरील शैक्षणिक व शारीरीक अर्हता प्राप्त करणाऱ्या सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती किंवा किमान 7 वी उत्तीर्ण असलेले व अग्निशामन विमोचक या पदावर किमान 15 वर्ष नियमित सेवा पुर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती. पदोन्नतीसाठी वयाची अट राहणार नाही.

शैक्षणिक अर्हता :

(i) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक

(ii) राष्ट्रीय अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा 6 महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेला असावा.

(iii) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिण, वाचणे व बोलणे)

(iv) एम.एस.सी.आय.टी परीक्षा उत्तीर्ण असावा.

सेवाप्रवेश नियमात 6 महिने कालावधीचे अग्निशामक प्रशिक्षण पुर्ण करणे अनिवार्य आहे. शासनाचे पाठयक्रमामध्ये खाजगी विद्यार्थ्यांना 6 महिन्याचे व अग्निशमन सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना शासनाचेच नियमानुसार 3 महिने कालावधीचे पाठयक्रम करावा लागतो.

श्री. विनोद थावरा जाधव हे सन 2012 मध्ये आग्निक या पदावर अग्निशमन सेवेत रूजू झाले. त्यांनी नियुक्ती होण्याचे आधी खाजगी विद्यार्थी म्हणून शासनाचे 6 महिने कालावधीचे प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम पुर्ण केले.

श्री. राजू धर्मा पवार हे सन 2004 ला आग्निक या पदावर अग्निशमन सेवेत रूजू झाले. त्यांना विभागातर्फे महाराष्ट्र शासनाचे 3 महिने कालावधीचे प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम करण्याकरीता पाठविण्यात आले व ते उत्तीर्णसुध्दा झाले.

दोघांनी केलेले प्राथमिक अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम एकच आहे.(समकक्ष). परंतु सेवाप्रवेश नियमामध्ये 6 महिने कालावधीचे प्रशिक्षण याप्रमाणे अर्हता असल्यामुळे श्री. विनोद थावरा जाधव आपल्या संवर्गात कनिष्ठ असूनसुध्दा अग्निशामक विमोचक या पदावर पदोन्नत झाले. सेवाप्रवेश नियमातील या त्रुटीमुळे सेवाजेष्ठ असलेले श्री. राजू धर्मा पवार यांच्यावर अन्याय झालेला आहे.

याकरीता सेवाप्रवेश नियमातील महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा 6 महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेला असावा. या अर्हते ऐवजी महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा प्राथमिक अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेला असावा. याप्रमाणे सुधारित करावे लागेल.

तसेच याच पदामध्ये पदोन्नतीकरीता किमान 7 वी उत्तीर्ण असलेले व अग्निशमन विमोचक या पदावर किमान 15 वर्ष नियमित सेवा पुर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती. पदोन्नतीसाठी वयाची अट राहणार नाही. याप्रमाणे तरतुद ठेवण्यात आली आहे. त्यामुळे ज्या कर्मचाऱ्यांनी अग्निशमन प्रशिक्षण पुर्ण केले नाही असे कर्मचारी सुध्दा पदोन्नत झाले आहे.

अग्निशमन सेवेचे कार्य फार कला कौशल्याचे आहे. कर्मचाऱ्याला आधुनिक यंत्रसामुग्री/वाहने, याबाबतची माहिती, विमोचक कार्यात नैपुण्यता या बाबी प्रशिक्षणाच्या माध्यमातून येत असतात. ही वास्तविक परिस्थिती आहे. अशावेळेस महत्वपुर्ण पदावर पदोन्नती देतेवेळेस कर्मचारी हा प्रशिक्षित असलाच पाहिजे. हे विभागाचे ठाम मत आहे. याकरीता या मुद्दयामध्ये कर्मचाऱ्याला महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा 3 महिने कालावधीचा प्राथमिक अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेला असावा. याप्रमाणे शैक्षणिक अर्हतेत सुधारणा करावी लागेल.

2. अग्निशामक विमोचक :

ही पदे 100% सरळसेवा भरती याप्रमाणे सेवाप्रवेश नियमात नियुक्तीची तरतुद आहे.या पदाची शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे.

1) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक

(2) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा 6 महिने अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम उत्तीर्ण असावा.

(3) एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण असावा.

(4) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद मुंबईला आहे. त्यामुळे या सेवेमध्ये येण्याकरीता शहरातील व विदर्भातील इच्छुक व गरीब विद्यार्थ्यांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र येथील प्रशिक्षण न घेता त्यांनी महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण महामंडळ, मुंबई (M.S.B.T.E) यांचेकडील अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम उत्तीर्ण केलेले आहे.

नागपूर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागात अग्निशामक विमोचक या पदाची जाहिरातीद्वारे नियुक्ती करतेवेळेस त्यांच्याकडे राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद येथील पाठयक्रम केला नसल्याने ते यांपासून वंचित राहतील.

त्याकरीता या पदांतील शैक्षणिक अर्हतेत पुढीलप्रमाणे आंशिक बदल करून राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य

तांत्रिक शिक्षण महामंडळ, मुंबई (M.S.B.T.E) यांचेकडील अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम उत्तीर्ण असावा. याप्रमाणे सुधारित करावा लागेल.

3. मुख्य मेक्यानिक कम ड्रायव्हर :

i. पदोन्नती :

फिटर कम ड्रायव्हर या पदामध्ये सेवाप्रवेश नियमानुसार नियमित 3 वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवाजेष्ठता व योग्यता अधीन पात्रता या निकषावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही. याप्रमाणे तरतुद निश्चित करण्यात आली आहे.

परंतु त्या पदाला लागणारी तांत्रिक शैक्षणिक अर्हतेचा उल्लेख नसल्याने तांत्रिक शैक्षणिक अर्हता नसतांना सुध्दा कर्मचाऱ्यांची पदोन्नती झाली आहे. त्यामुळे या पदामध्ये शैक्षणिक अर्हता नमुद करावी लागेल.

अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागातील अधिकारी/कर्मचारी वर्गाचे शासनमान्य सेवाप्रवेश नियमांतील प्रमुख अग्निशामक विमोचक, मुख्य मेक्यानिक कम ड्रायव्हर व अग्निशामक विमोचक या पदातील शैक्षणिक अर्हतेत खालीलप्रमाणे सुधारणा प्रस्तावित असून ही सुधारणा सेवाप्रवेश नियम अस्तित्वात आलेल्या दिनांकापासून ग्राहय समजल्या जाईल.

अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागातील अधिकारी/कर्मचारी (वर्गीकरण, सेवाभरती व पदोन्नती) विनियम – 2017

जोडपत्र – 2, अनुसूची–अ

| अ. क्र. | पदनाम | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>1. नामनिर्देशन/ सरळसेवेने<br>2. पदोन्नती<br>3. प्रतिनियुक्ती | शासनमान्य सेवाप्रवेश नियमातील शैक्षणिक अर्हतेबाबतची तरतुद | प्रशासनातर्फे शैक्षणिक अर्हतेत सुधारणा प्रस्तावित |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रमुख अग्निशामक विमोचक (Leading Fireman Rescuer) (गट–क) | नामनिर्देशन –50%<br><br>पदोन्नती – 50%<br><br>(प्रथम पाच वर्षाकरीता 80% अग्निशामक विमोचक व 20% चालक यंत्रचालक पदोन्नतीने) | नामनिर्देशन<br><br>अ) शैक्षणिक पात्रता<br><br>(1) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br><br>(2) राष्ट्रीय अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा 6 महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेला असावा.<br><br>(3) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिण, वाचणे व बोलणे)<br><br>(4) एम.एस.सी.आय.टी परीक्षा उत्तीर्ण असावा.<br><br>ब) किमान शारिरिक पात्रता :<br><br>(अ) उंची –165 से.मी. (महिला उमेदवारांसाठी उंची 162 से.मी)<br><br>(ब) छाती–साधारण 81 से.मी.– फुगवून 5 | अग्निशामक विमोचक या पदावर नियमित 3 वर्षे सेवा पूर्ण झालेल्या व महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा प्राथमिक अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नती किंवा किमान 7वी उत्तीर्ण असलेले व अग्निशामक विमोचक या पदावर किमान 15 वर्ष नियमित सेवा पुर्ण केलेल्या व महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा प्राथमिक अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्ठते नुसार पदोन्नती. पदोन्नती साठी वयाची अट असणार नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | से.मी. जास्त<br><br>(महिला उमेदवारांसाठी लागू नाही)<br><br>(क) वजन – 50 कि.ग्रॅ.<br><br>(ख) दृष्टी–चांगली<br><br>क) अनुभव :<br><br>उमेदवाराला शासकीय / निमशासकीय / महानगरपालिका / विशेष नियोजन प्राधिकरणे या संस्थामधील अग्निशमन सेवेतील अग्निशामक विमोचक किंवा चालक–यंत्रचालक या पदाव किमान 3 वर्ष कार्य केल्याचा अनुभव असावा.<br><br>ड) वयोमर्यादा –<br><br>उमेदवाराचे वय 30 वर्षापेक्षा जास्त असू नये.<br><br>इ) पदोन्नती :<br><br>अग्निशामक विमोचक या पदावर नियमित 3 वर्षे सेवा पूर्ण झालेल्या व वरील शॅक्षणिक व शारीरीक अर्हता प्राप्त करणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नती किंवा किमान 7वी उत्तीर्ण असलेले व अग्निशामक विमोचक या पदावर किमान 15 वर्ष नियमित सेवा पुर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नती. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही.<br><br>ई) वेतन : वेतन 5,200–20,000 (ग्रे.वे. 2,800) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br><br>उ) भत्ते : (नामनिर्देशन/ प्रतिनियुक्ती/ पदोन्नती)<br><br>ऑनकॉल पे रू. 150/– जोखीम भत्ता रू. 100/– युनिफॉर्म अपकीप रू. 150/– | |
| 2 | अग्निशामक विमोचक (Fireman Rescuer) | नामनिर्देशन 100% | नामनिर्देशन<br><br>अ) शैक्षणिक पात्रता<br><br>(1) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br><br>(2) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र | नामनिर्देशन<br><br>अ) शैक्षणिक पात्रता : राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा 6 महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण महामंडळ, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | शासन, मुंबई यांचा 6 महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम उत्तीर्ण असावा.<br><br>(3) एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण असावा.<br><br>(4) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहिणे, वाचणे व बोलणे)<br><br>ब) किमान शारिरिक पात्रता :<br><br>(अ) उंची –165 से.मी. (महिला उमेदवारांसाठी उंची 162 से.मी)<br><br>(ब) छाती–साधारण 81 से.मी.– फुगवून 5 से.मी. जास्त<br><br>(महिला उमेदवारांसाठी लागू नाही)<br><br>(क) वजन – 50 कि.ग्रॅ.<br><br>(ख) दृष्टी–चांगली<br><br>ड) वयोमर्यादा –<br><br>उमेदवाराचे वय 30 वर्षापेक्षा जास्त असू नये.<br><br>इ) वेतन : वेतन 5,200–20,000 (ग्रे.वे. 1,900) किंवा शासनाने वेळोवेळी मंजूर केलेली वेतनश्रेणी<br><br>उ) भत्ते :<br>(नामनिर्देशन / प्रतिनियुक्ती / पदोन्नती)<br><br>ऑनकॉल पे रू. 100 / – जोखीम भत्ता रू. 100 / – युनिफॉर्म अपकीप रू. 100 / – | मुंबई (M.S.B.T.E) यांचेकडील अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम उत्तीर्ण असावा. |
| 3 | मुख्य मेक्यानिक कम ड्रायव्हर (Mechanic cum Driver in-charge) | पदोन्नती 100% | फिटर कम ड्रायव्हर या पदावर नियमित 3 वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवाजेष्ठता व योग्यता अधीन पात्रता या निकषावर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल. पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही. | शैक्षणिक पात्रता :<br><br>1) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीण असावा.<br><br>2) आय.टी.आय. मधील मोटर मेक्यानिकल / डिझेल मेक्यानिक / समकक्ष कोर्स उत्तीर्ण असावा<br><br>3) जड वाहन चालविण्याचा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | परवाना आवश्यक<br><br>4) वैध जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक<br><br>5) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक<br><br>6) एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण आवश्यक<br><br>पदोन्नतीसाठी वयाची अट असणार नाही. |

करिता अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागातील अधिकारी/कर्मचारी वर्गाचे शासनमान्य सेवाप्रवेश नियमांतील प्रमुख अग्निशामक विमोचक, मुख्य मेक्यानिक कम ड्रायव्हर व अग्निशामक विमोचक या पदातील शैक्षणिक अर्हतेत सुधारणा करण्याचे विषयास महासभेने एकमताने मंजुर करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागात मागील 33 , 25, व 13 वर्षापासून प्रमुख अग्निशामक विमोचक (अग्रेसर अग्निक) व अग्निशमन विमोचक (अग्निक) या पदावर कार्यरत अंदाजे 50 ते 60 कर्मचारी नियमित कामावर असून कर्तव्य बजावत आहे. या दरम्यान त्यांना कोणतीही पदोन्नती न देता शासन निर्णय क्रं. 2015/1652/प्र.क्र. 166, दि. 12 मे 2017 रोजी सेवाभरती व पदोन्नती नियम अस्तीत्वात आल्याने त्यामधील शैक्षणिक पात्रता व तांत्रिक अर्हतेमुळे कालबध्द पदोन्नती लाभापासून वंचीत ठेवण्यात आले आहे. यामधील काही कर्मचारी लागलेल्या पदावर सेवानिवृत्तीच्या उंबरठयावर आहेत.

अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागात उपरोक्त सर्व कर्मचाऱ्यांची ठराव क्रं. 31, दि. 31.12.1976 व ठराव क्रं. 118, दि. 25.06.1986 च्या सुधारीत पदोन्नती व भरतीचा नियमानुसार नियुक्ती झालेली असून त्यांच्यावर नविन शासन निर्णयानुसार शैक्षणिक अहर्ता व तांत्रिक प्रशिक्षणाची अट लादण्यात येत आहे. करीता पुढील प्रमाणे सूचना नमूद करण्यास विनंती आहे.

**''अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागातील 24 वर्षेपेक्षा जास्त सेवा पुर्ण करणाऱ्या व सेवानिवृत्तीच्या उंबरठयावर असलेल्या प्रमुख अग्निशामक विमोचक/अग्निशमन विमोचक या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यापैकी ज्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीस कमीत कमी 3 वर्षाचा कालावधी शिल्लक आहे अश्या कर्मचाऱ्यांना उप अग्निशमन अधिकारी या पदाला असलेली शैक्षणिक पात्रता (म्हणजेच कोणत्याही शाखेचा पदविधर ) तसेच तांत्रिक अर्हता (उप अग्निशमन अधिकारी पाठयक्रम) या अटीस शिथीलता देवून त्यांना वेतन 9300–34800, ग्रेड पे 4200 (उप अग्निशमन अधिकारी गट – क ) कालबध्द पदोन्नतीचा लाभ व सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात यावी.**

''अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागातील 24 वर्षेपेक्षा जास्त सेवा पुर्ण करणाऱ्या प्रमुख अग्निशामक विमोचक/अग्निशमन विमोचक या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यापैकी ज्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीस 3 वर्षा पेक्षा जास्त कालावधी शिल्लक आहे अश्या कर्मचाऱ्यांना उप अग्निशमन अधिकारी या पदाला असलेली शैक्षणिक पात्रतेची (म्हणजेच कोणत्याही शाखेचा पदविधर ) ही अट शिथील करण्यास व उप अग्निशमन अधिकारी पाठयक्रम पुढील तीन वर्षाच्या कालावधीत पुर्ण करतील या अटीवर त्यांना वेतन 9300–34800, ग्रेड पे 4200 (उप अग्निशमन अधिकारी गट – क ) कालबध्द पदोन्नतीचा लाभ व सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात यावी.

''अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागातील 12 वर्षेपेक्षा जास्त सेवा पुर्ण करणाऱ्या अग्निशमन विमोचक या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यापैकी ज्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीस 3 वर्षा पेक्षा जास्त कालावधी शिल्लक आहे अश्या कर्मचाऱ्यांना अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम पुढील तीन वर्षाच्या कालावधीत पुर्ण करतील या अटीवर त्यांना वेतन 5200–20000, ग्रेड पे 2800 (प्रमुख अग्निशामक विमोचक) या पदाचा कालबध्द पदोन्नतीचा लाभ व सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात यावी.

**अग्निशामक विमोचक (Fire Rescuer) या नामनिर्देशीत पदाकरीता शैक्षणिक पात्रता : राज्य अग्निशमन केन्द्र महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा 6 महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण महामंडळ, मुंबई (M.S.B.T.E) यांचेकडील अग्निशामक प्रशिक्षण उत्तीर्ण असावा. ज्या पुरूष /महिला उमेदवारांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केन्द्र महाराष्ट्र शासन मुंबई यांचेकडील 6 महीने (किंवा समकक्ष) कालावधीचा पाठयक्रम उत्तीर्ण केला नसेल त्यांना नियुक्तीनंतर 1 वर्षाच्या कालावधीत स्वखर्चाने हा पाठयक्रम उत्तीर्ण करणे बंधनकारक राहील.** या मा.सदस्य ॲड. संजयकुमार बालपांडे व मा. सदस्य राजकुमार साहू यांनी दिलेल्या लिखीत सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

ठराव क्रमांक 156ः– OPD क्लिनिक (बाहयरुग्ण वैद्यकीय व्यवसायिक) नामांकनासाठी विभागाद्वारे वापरण्यात येणारे पुर्वनिकष कायम ठेवून, मुख्यत: रहिवाशी सदनिकेतील रहिवाशी कुटुंबांना खाजगी क्लिनिक पासून त्रास होऊ नये व वैद्यकीय व्यवसायिकांच्या बाहयरुग्ण व्यवसायाबाबत अधिकारांचे हनन होणार नाही. या बाबी विचारात घेऊन आरोग्य विभागाद्वारे खालीलप्रमाणे निकष प्रस्तावित करण्यात आले. सदर निकषात वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभा दि. १२/१०/२०१७ मधील सुचनेप्रमाणे बदल/सुधारणा सह प्रस्ताव सभागृहाकडे चर्चेकरीता सादर करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून या धोरणासंदर्भात अनेक सूचना असल्यामुळे सर्वकष धोरण ठरविण्याकरिता हा विषय आरोग्य समितीकडे अग्रेषित करण्यात यावा. या मा. सत्तापक्ष नेते श्री.संदीप जोशी यांनी केलेल्या सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येतो. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस मंजूर मंजूरच्या आवाजाने सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

1. संपूर्ण रहिवाशी सदनिका (रेसीडेंशीयल फ्लॅट स्किम) मध्ये वैद्यकीय व्यवसायाचे नामांकन अनुज्ञेय नसावे.(ठराव संमत झाल्यानंतर जर वैद्यकीय व्यवसायिक उल्लंघन करत असतील अशावेळी एमआरटीपी/ डिसीआर २००० अन्वये संबंधीत प्राधिकरणास संबंधीत व्यवसाय धारकाचे विरुध्द कायदेशिर कार्यवाहीचे अधिकार असतील)
2. ओपीडी व्यवसायिक जागा वाणिज्यीक स्वरुपाची असावी.
   I. व्यवसायिक जागेचे क्षेत्रफळ किमान १०० स्के.फिट असावे.
   II. लोखंडी शटर असलेल्या व्यवसायिक जागेचा प्रवेश मुख्या मार्गावरुन किंवा त्याच्या उपमार्गावरुन थेट असावा. नामनिर्देशित नावाच्या फलकात शैक्षणिक अहर्ता व दवाखान्याची वेळ स्पष्ट नमुद करणे अनिवार्य असावे.
3. रहिवाशी सदनिकेत संबंधीत जागेचा नकाशा वाणिज्यीक वापराकरीता मंजूरी धारण करीत असल्यास अशा जागेत ओपीडी व्यवसाय करण्यास किमान ७० टक्के गाळेधारकांची संमती घेणे बंधनकारक असावे.
4. धार्मीक अथवा सामाजिक समुदायाचे जागेत धर्मार्थ वैद्यकीय सेवेकरीता बाजूच्या रहिवाशांची संमती बंधनकारक नसावी.
5. बाहयरुग्ण व्यवसायिक संरचना विचारात घेऊन नामांकन शुल्क वसूलीबाबत प्रस्तावित धोरण.

| अ. क्र. | व्यवसायिक संरचना | पुर्व स्थापीत वार्षिक शुल्क | १ एप्रिल २०१८ पासून आकारण्यात येणारे प्रस्तावित वार्षिक शुल्क | आरोग्य समिती सभा दि. १२.१०.२०१७ च्या सुचनेप्रमाणे बदल/सुधारणा |
|---|---|---|---|---|
| १ | जनरल बाहयरुग्ण व्यवसाय (ओपीडी क्लिनिक) | ५००/— रु. | **१०००/— रु.** | **२०००/— रु.** |
| २ | **मल्टीस्पेशालिटी** व्यवसाय बाहयरुग्ण (ओपीडी क्लिनिक) | ५००/— रु. | **३०००/— रु.** | **४०००/— रु.** |
| ३ | नेत्र चिकित्सा/दंत चिकित्सा व्यवसाय (ओपीडी क्लिनिक) | ५००/— रु. | **२०००/— रु.** | **४०००/— रु.** |
| ४ | धर्मार्थ दवाखाना बाहयरुग्ण ओपीडी क्लिनिक | ५००/— रु. | **१०००/— रु.** | **अनुमोदीत** |
| ५ | पॅथालॉजी लेबोरेटरी | १०००/— रु. | **३०००/— रु.** | **४०००/— रु.** |
| ६ | रक्तपेढी (ब्लड बॅक) | १०००/— रु. | **२०००/— रु.** | **अनुमोदीत** |

उपरोक्त प्रस्तावास समितीने सुचविलेल्या दुरुस्ती व मंजूरीसह प्रस्तावित धोरण कसे असावे (परिशिष्ट—अ सोबत सलग्न) बाहयरुग्ण व्यावसायिक धोरण सर्वसाधारण सभेपुढे चर्चेकरीता विचारात घेण्यास सादर.

परिशिष्ट—अ

असे असावे धोरण

१) शहरातील कुठल्याही निवासी गाळयांमध्ये कुठल्याही प्रकारचे बाहय रुग्ण व्यवसाय चालविण्यावर प्रतिबंध असावा.

२) एमआरटीपी कायद्यात आवश्यक त्या सुधारणा कराव्यात. अशा व्यवसायासाठी दिलेल्या नोटीसीनंतर संबंधीत व्यवसाय बंद करण्याचे अधिकार मनपाला असेल.

३) नियमबाहय वा तक्रारीअंती नोटीसमध्ये कारवाई होत असेल तर मनपाला असे केंद्र बंद करण्याचे अधिकार असतील.

४) निवासी गाळयांचा गैरवापर करणाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई प्रस्थावित असेल. यात मोठा दंड आकारुन त्याचे संबंधीत गाळे जप्तीचे अधिकार मनपाला असेल.

५) निवासी गाळयाच्या बाहय भागातील व्यावसायिक गाळयांमध्ये पीसीपीएनडीटी कायद्यान्वये दिलेल्या परवानगीसाठी त्याच इमारतीत राहणाऱ्यांची नाहरकत असावी. शिवाय, संबंधीत व्यवसाय करणाऱ्यांची इमारतीच्या बाहेर त्यांची पार्किंगसाठी स्वतंत्र अशी व्यवस्था असावी.

६) सोनोग्राफी, फिजीओथेरपी, एक्स रे, पॅथॉलॉजी व इतर वैद्यकीय व्यवसायाला निवासी इमारतीच्या बाहेरच परवानगी असेल.

७) निवासी गाळयातील सर्व गाळेधारकांच्या परवानगीनंतरच इमारतीच्या बाहयभागातील गाळयात परवानगी असावी. कारण, अशा व्यवसायामुळे गाळेधारकांना रेडीएशन वा इतर प्रकारच्या किरणांचा त्रास होण्याची शक्यता अधिक असते.

८) मनपाने पीसीपीएनडीटी कायदा अधिक कठोर करावा, यानुसार तात्पुरत्या स्वरुपात झालेली नोंदणी व परवानगी रद्द करण्याचे अधिकार मनपाकडे अबाधित राहील.

९) तक्रार आल्यानंतर जिल्हा वा राज्य पीसीपीएनडीटी कमिटीकडे न्याय मागण्यासाठी जाण्याऐवजी परवानगी देणाऱ्या कमिटीनेच त्यावर निर्णय घ्यावा.

१०) निवासी गाळेधारकासोबत व्यवसाय करणाऱ्यालाही दाद मागण्याचा अधिकार असावा. मात्र, यात गाळेधारकांना होणारा त्रास सर्वोच्च मानूनच त्यासंबंधीचे निर्णय घेतले जावेत.

११) शहरातील कुठल्याही निवासी गाळयांमध्ये यानंतर वा सध्या असलेले सर्व बाहय रुग्ण व्यवसाय केंद्राची तपासणी करावी. त्यानुसार प्रस्तावित नव्या धोरणानुसार नियम वा अटी तसेच शर्तीचे उल्लंघन असेल तर ते तातडीने बंद करण्यात यावे.

१२) अपार्टमेंट वा निवासी गाळे बनविण्याऱ्या बिल्डर्सला अशा व्यवसाय करण्यासाठी गाळे विक्री करता येणार नाही, असे बंधन घालण्यात यावे. यासाठी नकाशा मंजुरी करतानांच नगररचना विभागाकडून अट घातली जावी. आरोग्य विभागानेही केंद्रांना मंजूर देताना याप्रकारचे नाहरकत प्रमाणपत्र व हमीचे पत्र देणे बंधनकारक करावे.

१३) बाहय व्यवसायासाठी निवासी गाळयाच्या बाहेर भागात स्वतंत्र असे गाळे बांधावेत. मात्र, इमारतीच्या आत अशा व्यवसाय करणाऱ्यास परवानगी नसेल. पार्किंग वा इतर सुविधाही देण्यावर प्रतिबंध असावा.

१४) शहरात निवासी गाळयांमध्ये सध्या सुरु असलेल्या सर्व बाहय रुग्ण व्यवसायाची तपासणी करण्यात यावी. काही तक्रारी असल्यास असे केंद्र बंद करण्याची कारवाई सुरु करावी.

१५) सध्या शहरात सुरु असलेल्या सर्व अशी केंद्र बंद करण्याची कारवाई करतानाच, त्यांच्यावर गाळयांमध्ये विनापरवानगी स्ट्रक्चरल बदल वा दुरुस्ती केली असल्यास दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

१६) निवासी गाळयांव्यतिरीक्त बाहय भागात वा इतर इमारतींमध्ये स्वतंत्र व्यवसाय करणाऱ्यांना मनपाने दिलेल्या परवानगीनुसार तपासणी पथकाकडून नियमित तपासणी करण्यात यावी. प्रत्येक तीन महिन्यात तपासणी करुन त्यांच्याकडून हमीपत्र घेण्यात यावे.

१७) हमीपत्राचे उल्लंघन करण्यात आल्याचे प्रकार उघडकीस आल्यास तातडीने परवानगी व नोंदणी रद्द करण्याचे अधिकारही मनपाला असेल.

१८) प्रत्येक तीन महिन्यासोबत आकस्मिक तपासणीचे अधिकारही मनपाला असेल. त्यावर कुणालाही आक्षेप घेता येणार नाही.

१९) शहरातील प्रत्येक निवासी गाळयांमधील रहिवाशांच्या जीवीतांचे रक्षण, जगण्याचा अधिकार वा त्यांचे स्वातंत्र्य याचे अधिकार जतन करण्याचे मनपाचे कर्तव्य आहे. त्यानुसार, मनपाचे शहराच्या हितासाठीचे हे धोरण असेल.

२०) या सर्व अटी, नियम, निकषांचे पालन करावे. काही तांत्रिक वा इतर अडचणी आल्यास आयुक्तांना अंतीम निर्णयाचा अधिकार असेल.

**<u>ठराव क्रमांक 157</u>ः—** नागपूर शहरबस संचलनाकरीता शहरातील नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर आगार (देखभाल, दुरूस्ती) निर्मिती करीता मनपा मंजूर करारनाम्यातील परिशिष्ट क्र. 4.2 अन्वये मोकळी जागा देणे असल्याने इथेनॉल संचालित (ग्रीनबस) मे. स्कॅनिया कंपनीस हस्तांतरीत करण्यात आली असून आगार निर्मिती करीता वाडी नाका ही जागा मोकळी करून देण्याकरीता सदर जागेवरील अस्तित्वात असलेली इमारत व इतर शेड तोडण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

| | |
|---|---|
| **निगम सचिव** | **कार्यकारी महापौर** |
| **नागपूर महानगरपालिका,नागपूर** | **नागपूर महानगरपालिका,नागपूर** |